admn 19-20


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **संकेतस्थळ : www.mcaer.org** **दूरध्वनी (०२०) २५५२८६८८**


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१११९/२२०१ दि. २४ सप्टेंबर,२०१९

## परिपत्रक

**विषयः- कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांकरिता वाढीव प्रवेश कार्यक्रमाबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली नियोजित वेळापत्रकानुसार विहित वेळेत पूर्ण करण्यात आलेली आहे.

तथापि, अजूनही सदर अभ्यासक्रमांमध्ये काही प्रमाणात जागा रिक्त आहेत / होत आहेत. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवारांना सदरच्या रिक्त जागांवर प्रवेशाची संधी उपलब्ध करून देणे, कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेंतर्गत हस्तांतरित करण्याची महाविद्यालयांना संधी उपलब्ध करणे इत्यादी बाबी विचारात घेऊन प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे विचाराधीन होते. यास शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

यास्तव या परिपत्रकाद्वारे चारही कृषी विद्यापीठातील बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान), बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) आणि बी.एफ्.एस्सी. (मत्स्यविज्ञान) हया व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशासाठी वाढीव प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित उमेदवार या वाढीव प्रवेश कार्यक्रमात सहभागी होण्यास पात्र नाहीत. सदरचा प्रवेश कार्यक्रम संबंधित कृषी विद्यापीठांच्या नियंत्रणाखाली पुढील ठिकाणी राबविण्यात येईल.

| महाविद्यालये | प्रवेशाचे ठिकाण |
|---|---|
| महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि. अहमदनगर यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये | डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी, जि.अहमदनगर |
| डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये | कृषी महाविद्यालय, कृषी नगर, अकोला |

| महाविद्यालये | प्रवेशाचे ठिकाण |
|---|---|
| वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये | कृषी महाविद्यालय,<br>कृषी नगर, परभणी ४३१ ४०२. |
| डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि. रत्नागिरी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये | कृषी महाविद्यालय, दापोली जि.रत्नागिरी |

ज्या महाविद्यालयांच्या जागा रिक्त आहेत, अशा रिक्त जागांचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. अशा सर्व महाविद्यालयांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांची मूळ कागदपत्रे प्राप्त करणे, आवश्यक ते शुल्क प्राप्त करण्यासाठी वरील ठिकाणी प्रवेशाच्या कालावधीमध्ये उपस्थित रहावे. वाढीव प्रवेश कार्यक्रमाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | २६/०९/२०१९ |
| २ | ज्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयास संस्थास्तरीय रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी वर्ग करावयाच्या आहेत, त्यांनी लेखी स्वरूपात कृषी परिषद कार्यालयाकडे विनंती पत्र ई-मेलद्वारे **edn_mcaer@rediffmail.com** या ई-मेल पत्त्यावर पाठविण्याचा कालावधी. | २६/०९/२०१९ ते ३०/०९/२०१९ |
| ३ | जे प्रवेशोच्छुक उमेदवार दि. २६/०७/२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम गुणवत्ता यादीमध्ये (सदरची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे) समाविष्ट नाहीत, अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा कालावधी. | २६/०९/२०१९ ते ०३/१०/२०१९ |
| ४ | नव्याने प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जांची यादी. | ०४/१०/२०१९ |
| ५ | संस्थास्तरीय कोटयातून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकडे वर्ग केलेल्या जागांसह रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी. | ०५/१०/२०१९ |
| ६ | राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांतर्गत रिक्त असलेल्या जागांकरिता संबंधित कृषी विद्यापीठस्तरावर **'जागेवर प्रवेश फेरी'**. | |
| | (अ) गुणवत्ता यादीमधील संबंधित शाखेतील ६० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण असलेले उमेदवार | ०९/१०/२०१९ |
| | (ब) गुणवत्ता यादीमधील संबंधित शाखेतील ६० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार | १०/१०/२०१९ |
| | (क) गुणवत्ता यादीमधील सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) | ११/१०/२०१९ |
| ७ | संस्थास्तरीय कोटयातील रिक्त जागा संबंधित महाविद्यालयस्तरावर भरण्याचा अंतिम दिनांक | ११/१०/२०१९ **(दुपारी ४.०० पर्यंत)** |

**प्रवेश कार्यक्रमाबाबत महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.**

१. जे उमेदवार राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेशित आहेत, असे उमेदवार या प्रवेश कार्यक्रमामध्ये समाविष्ट होण्यास पात्र नाहीत.

२. दि. २६/०७/२०१९ रोजी प्रसिध्द झालेल्या गुणवत्ता यादीमध्ये ज्या उमेदवारांची नावे आहेत, अशा उमेदवारांनी पुन्हा नव्याने अर्ज दाखल करू नयेत. तथापि, या उमेदवारांना त्यांच्या प्रवेश अर्जामध्ये बदल करावयाचा असल्यास त्याबाबतची सुविधा (Edit) लॉग-इन मध्ये उपलब्ध आहे.

३. वरील अ.क्र.१ व २ येथील उमेदवार वगळता पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१९-२० मध्ये नमूद केलेली पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी, त्यांना योग्य तो प्रवर्ग, गुण, आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी, पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१९-२० मध्ये नमूद केलेली मूळ कागदपत्रे उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. अशा कागदपत्रांची शहानिशा करूनच उमेदवारांनी ऑनलाईन प्रवेश अर्जामध्ये माहिती भरावी व संबंधित कागदपत्रे अपलोड करावीत.

४. उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये भरलेल्या माहितीची तपासणी न करता उमेदवाराचा यादीमध्ये समावेश करण्यात येईल व जागेवरील प्रवेश फेरीचे वेळी संबंधित कृषी विद्यापीठ व महाविद्यालयाकडून अशा मूळ कागदपत्रांची तपासणी करूनच प्रवेश निश्चित करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५. महाविद्यालयांनी प्रवेश देतेवेळी पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेतील जागेवरील प्रवेश फेरीविषयी 'परिशिष्ट एच' मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबवावी.

६. संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन, उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयाशी संबंधित कृषी विद्यापीठाच्या वर नमूद केलेल्या प्रवेशाच्या ठिकाणी व दिनांकास **सकाळी ९.०० ते ११.३० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

७. कृषी विद्यापीठांनी सकाळी ९.०० ते ११.३० या वेळेत त्यांच्याकडे उपस्थित असलेल्या उमेदवारांची संगणकावर नोंद घ्यावी. यानंतर मे.केटीपीएल, पुणे यांच्याकडून अशा उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करून संबंधित कृषी विद्यापीठास एक तासाच्या कालावधीत गुणवत्ता यादी पुरविण्यात येईल. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

८. योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे कृषी विद्यापीठांनी संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावर कृषी विद्यापीठांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'केटीपीएल' यांची असेल.

९. जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित कृषी विद्यापीठांकडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल.

१०.संवैधानिक आरक्षित जागांवर (सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग वगळता) प्रवेशाकरिता जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य असेल.

११.उमेदवारांनी आवश्यक त्या शुल्काव्यतिरिक्त 'जागा स्वीकृती शुल्क' म्हणून रू.१०००/- संबंधित महाविद्यालयांकडे जमा करावे. संबंधित महाविद्यालयांनी सदर जागा स्वीकृती शुल्काची एकत्रित रक्कम STATE CET CELL AGRI MS MUMBAI यांचे भारतीय स्टेट बँक, मुंबई मुख्य शाखा येथील खाते क्र. ३७७१८३९१००८, IFSC Code SBIN0000300 या खात्यावर त्वरीत जमा करावी. याबाबतची पावती कृषी परिषद कार्यालयास सत्वर सादर करावी. संस्थात्मक कोटयातील प्रवेशासंदर्भात जागा स्वीकृती शुल्क लागू नाही.

१२.प्रवेशाविषयी इतर कार्यपध्दती व नियम पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केल्यानुसार असतील.

१३.सदर परिपत्रक http://www.dtemaharashtra.gov.in / http://www.mcaer.org / maha-agriadmission.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**(विश्वजीत व. माने)**
**महासंचालक तथा**
**सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण**

प्रतः-

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.

यांना सूचित करण्यात येते की, अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवारांना सदर परिपत्रकाच्या संकेतस्थळावरील उपलब्धतेबाबत भ्रमणध्वनी संदेश पाठवावेत. व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे नोडल अधिकारी यांना सुध्दा सदर परिपत्रकाबाबत अवगत करण्यासाठी भ्रमणध्वनी संदेश पाठवावेत. तसेच चार कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी अंतिम गुणवत्ता यादी तयार करून परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या सुविधा संगणक आज्ञावलीमध्ये उपलब्ध करून द्याव्यात.

२. मे. टेकनिक आयटी सोल्यूशन, लाईफ स्क्वेअर सोसायटी, ए ३०१, लोहगाव, पुणे ४७

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरच्या परिपत्रकास संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

३. मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.

४. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच उक्त प्रवेश प्रक्रिया कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी राबविण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करावी.